IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 6, Issue 7, March 2026
Impact Factor: 8.2

# ‘रिंगाण’ कादंबरीतील मानव आणि निसर्गाचे नाते

धुरा जगन सरंजामे

एम. ए. भाग २, सत्र ४, विषय मराठी

विलिंग्डन महाविद्यालय, सांगली ( स्वायत्त )

walke669@gmail.com

**कादंबरीचे नाव :-** ‘रिंगाण’ – ( लेखक ‘कृष्णात खोत’ )

**प्रस्तावना**

ज्या साहित्यामध्ये पर्यावरण विषयक प्रश्नांची मांडणी केलेली असते, पर्यावरण विषयक जाणीवा प्रकट झालेल्या असतात व मानवी जीवनाचा निसर्गाशी असलेला संबंध तपासला जातो. त्या साहित्याला पर्यावरणीय साहित्य म्हणजेच ‘environmental literature’ असे म्हणतात.

साहित्यकृतीतील कोणत्याही भागात व कितीही प्रमाणात पर्यावरण विषयीच्या जाणिवा किंवा निसर्ग आणि मानव यांचे नाते उलघडून दाखवण्यात आले आहे, याचा धांडोळा पर्यावरणीय साहित्यात घेतला जातो.

कृष्णात खोत लिखित ‘रिंगाण’ ( २०१७ ) ही कादंबरी अशाच प्रकारे मानवाचे निसर्गाशी व त्यांच्यातील घटकाशी असलेले नाते सांगणारी आहे. भौतिकवाद व भांडवलशाही मुळे मानव कसा निसर्गाशी दूर जात आहे, निसर्गापासून तुटत चालला आहे याचे वास्तव चित्रण या कादंबरीत आले आहे. सध्याच्या युगात माणूस किती स्वार्थी होत चालला आहे व केवळ आपल्या फायद्याचा विचार करत आहे तसेच निसर्गाला आपल्या भोगवस्तू प्रमाणे हाताळत आहे याचे गंभीर वास्तव ही कादंबरी मांडते. सध्याच्या युगात महत्वाचे असणारे पर्यावरण विषयक भान व निसर्गाचे आणि मानवाचे नाते ही कादंबरी अधोरेखित करते.

**पर्यावरणीय साहित्याची संकल्पना**

पर्यावरणीय साहित्यामधील निसर्ग, मानवी जीवन व त्यांची संस्कृती आणि त्यांच्याशी असणारा पर्यावरणाचा संबंध याचा वेध घेतला जातो. पर्यावरणीय साहित्यात केवळ निसर्गाची वर्णने येत नाहीत, तर पर्यावरण विषयक गंभीर प्रश्न जसे की हवा, जल, प्रदूषण, तापमान वाढ, जंगलतोड, वृक्षतोड वाढत चाललेले नागरिकीकरण, औद्योगिकीकरण, प्राण्यांचे विश्व व प्राण्यांसंबंधीच्या समस्या या सर्व ‘पर्यावरणीय साहित्यात’ येतात.

पर्यावरणीय साहित्य हे पर्यावरणाविषयी लोकांमध्ये जाणीव जागृती करणारे असे साहित्य आहे. यामध्ये निसर्ग, पशुपक्षी, वृक्ष या सर्वांबद्दलचे प्रेम प्रकट झालेले दिसून येते. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे उदा. वृक्षतोड, जंगले हटवून औद्योगीकीकरण करणे, प्राण्यांची शिकार, जल प्रदूषण यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जातो. शाश्वत जीवनासाठी व पुढच्या पिढ्यांसाठी आपण आत्ताच पर्यावरण विषयक जाणीव निर्माण करून निसर्गासाठी काहीतरी केले पाहिजे, ही आपली नैतिक जबाबदारी आहे, अशी प्रेरणा वाचकांच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न ‘पर्यावरणीय साहित्य’ करते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, March 2026 Impact Factor: 8.2

मराठीमध्ये पर्यावरणीय साहित्य विपुल प्रमाणात आढळते. पर्यावरण, निसर्ग व ग्रामीण जीवनाविषयी लेखन करणारे अनेक साहित्यिक मराठी साहित्य क्षेत्रात आहेत. ज्यामध्ये मारुती चित्तमपल्ली, दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, राजन गवस, प्रसाद कुमठेकर, रत्नदीप जोगदंड आणि कृष्णात खोत इत्यादी लेखकांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो.

**लेखक परिचय**

कृष्णात खोत यांची 'रिंगाण' ही कादंबरी एक उत्तम पर्यावरणीय साहित्याचा नमुना ठरते. कृष्णात खोत हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे साहित्यिक आहेत. ते पन्हाळ्या जवळ एका ग्रामीण परिसरात जन्मले. ग्रामीण जीवनातील व्यथा, वेदना, शेतीविषयक, गावगाड्याच्या समस्या, लोकांचे स्वभावविशेष, निसर्ग व निसर्गाचे सूक्ष्म बारकावे तसेच निसर्गाची बदलती रूपे आणि मानव निसर्गाचा संबंध असे विषय त्यांच्या साहित्यातून नेहमी दिसून येतात. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये निसर्गाविषयी केवळ जिव्हाळाच दिसून येत नाही तर एक चिंतनाची जोड ही त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसून येते म्हणूनच वाचकांना त्यांच्या कादंबऱ्या भावतात. गावठाण (२००५), रौंदाळा (२००८), झड-झिंबड (२०१२), धूळ माती (२०१४), रिंगाण (२०१७), काळ्या-माळ्या भिंगोळ्या (२०२४) या त्यांच्या आजवर प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्या आहेत. 'रिंगाण' ही सुद्धा त्यांची अशीच एक सुंदर कादंबरी आहे, ज्यात निसर्गाविषयीची आत्मियता, रानशिवारा विषयीचा जिव्हाळा व पशु पक्षांबद्दलचे अपार प्रेम दिसून आले आहे.

**रिंगाण कादंबरी**

'रिंगाण' ही कादंबरी पर्यावरण विषयक जाणीवा आणि मानवाचे निसर्गाशी असलेली नाते समर्थपणे मांडते मानव आणि निसर्गाचे साहचार्य या कादंबरीतून हळुवारपणे उलघडते, तसेच मानव हा सध्या किती स्वार्थ केंद्री होत चालला आहे व केवळ स्वतःचाच विचार करत आहे, ज्या गोष्टीत त्याचा फायदा आहे त्याच गोष्टी मानव करण्यास प्रवृत्त होतो व फायदा संपला की त्यांना सोडून देतो याचे भीषण वास्तव रिंगाण ही कादंबरी सक्षमपणे मांडते.

ही कथा आहे देवाप्पा आणि त्याच्या मुदीवाल्या म्हैशीची. त्यांच्यातील प्रेमाची, त्यांच्या संघर्षाची व त्यांच्यातील नात्याची. झोळंबी या गावात एक धरण प्रकल्प उभा केला जातो व संपूर्ण झोळंबी हे गाव तेथून उठवले जाते, त्या गावाचे दुसऱ्याच एका ठिकाणी पुनर्वसन केले जाते, ज्या लोकांचे दुसरीकडे पुनर्वसन केले जाते त्यांना त्या धरण प्रकल्पाचा काही फायदा होणार नसतो. केवळ काही लोकांच्या फायद्यासाठी झोळंबी वासीयांना त्यांचा मूळ अधिवास सोडून दुसरीकडे राहावे लागते. त्या नव्या ठिकाणी या गावकऱ्यांची मुळे रुजत नाहीत, त्यांना त्यांच्या आधीच्या शेतशिवाराची झाडाझुडपांची व पशु पक्षांची आठवण दुःख देत राहते, त्यांना नरक यातना सहन करायला लागतात.

ज्यावेळी झोळंबी या गावाचे पुनर्वसन करायचे ठरते, त्यावेळी गावकऱ्यांना स्वतः सोबत सर्वच साहित्य आणता येत नाही आणि त्यावेळेस मानवातील स्वार्थीपणा मतलबीपणा खऱ्या अर्थाने दिसून येतो. देवाप्पाची मुदीवाली म्हैस ही वेळच्यावेळी गाभ राहत नसते तिच्याकडून दूध दुभत्याची अपेक्षा करता येत नसते, म्हणून तिला त्याच ओसाड, निर्मनुष्य गावात सोडले जाते. तिच्यासोबत कित्येक जनावर असाच फायद्या तोट्याचा विचार करून सोडली जातात. त्यावेळी देवाप्पाच्या टेम्पो मागून मुदीवाली म्हैस टाहो फोडून धावत येत असते, पण तिला देवाप्पा सोबत नेत नाही. पुन्हा कित्येक महिन्यांनी देवाप्पा आपल्या आईच्या सांगण्यावरून मूळ गावी जातो. तेव्हा त्याला तीच मुदीवाली म्हैस एका कळपात बसलेली दिसते. तिने एका रेडकाला ही जन्म दिलेला असतो. देवाप्पा हे पाहून खूप आनंदी होतो. आपल्या म्हैशीला आता आपल्या सोबत न्यायचे असे मनाशी ठरवतो, कारण आता त्याला तिच्यात फायदा दिसत आहे. मात्र ती म्हैस देवाप्पा सोबत यायला काही केल्या तयार होत नाही, ती तिच्या त्या कळपात, तिच्या अधिवासात रमलेली असते. कधी काळी पाळीव असणारी मुदीवली

म्हैस आता रानटी बनलेली असते. तो तिला घेऊन जायचे खूप प्रयत्न करतो, तिला जबरदस्ती घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो, पण मुदीवाली म्हैस कोणत्याच गोष्टीला प्रतिसाद देत नाही. ती तिच्या निर्णयावर ठामपणे उभी राहते व एका म्हैशी पुढे देवाप्पा हारतो आणि म्हैस जिंकते. 'माणसाच्या स्वार्थापुढे एका जनावराचा प्रामाणिकपणा जिंकतो' देवाप्पा स्वार्थी झाला, पण ती म्हैस आपल्या कळपाशी आपल्या अधिवासाशी व ज्या गावाने तिला आसरा दिला त्या निर्मनुष्य गावाशी प्रामाणिक राहते.

देवाप्पाला गाव सोडताना इछया असूनही मुदीवालीला सोबत नेता येत नाही. व नंतर तोच देवाप्पा तिला नेण्यासाठी आटापिटा करत असतो, त्याला हे सर्व कळत आहे. कादंबरीमध्ये देवाप्पाच्या तोंडी एक वाक्य दिले आहे. "या सगळ्यात माणूस लय उजवा, मतलबी. स्वतःला वाचवणारा. जपणारा" (पृ.१०१) अशा पद्धतीने मानव आणि निसर्गातील नाते ही कादंबरी सुंदररित्या मांडते.

**'रिंगाण' कादंबरीमधून जाणवणारे विविध पैलू**

१. **औद्योगिकीकरण व भांडवलीकरणाला विरोध :-** या कादंबरीत भांडवलीकरण व औद्योगिकीकरणाने होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाला विरोध दर्शविला आहे. देवाप्पाला धरणाच्या कामासाठी आलेल्या मशिनरी बघायला आवडत नाही, तो म्हणतो "ती मोडतोड, ती पडझड, तो धुरळा, ती माती, तिचा बुक्का आणि चार-आठ रोजान यात सापडणारी माणसं" तसेच माणूस कष्ट न करताच फळाची अपेक्षा करतो, चैनी करण्यात जीवन व्यतीत करतो, असे देवाप्पाला वाटते.

२. **लुप्त झालेली समृद्धता :-** देवाप्पाचे झोळंबी हे गाव सुखासमाधानात नांदत होते. समृद्ध होते परंतु त्यांचे जेव्हा दुसऱ्या गावी पुनर्वसन झाले. तेव्हा त्यांची परिस्थिती बिकट झाली. देवाप्पाच्या आईला वाटते की जंगलात सोडलेल्या जनावरांचे त्यांना शाप लागले, म्हैशी कसायाला विकण्यास ती विरोध करते. यातून प्राण्यांविषयीचे प्रेम आणि जिव्हाळा व्यक्त झाला आहे. कारण अशा बिकट परिस्थितीत ही देवाप्पाची आई प्राण्यांबद्दल प्रेम व्यक्त करते.

३. **मानव आणि निसर्ग यांच्यातील साहचार्य :-** कादंबरीमध्ये देवाप्पाच्या कुटुंबाकडून निसर्गाबद्दल साहचार्याची भावना स्वीकारलेली दिसून येते. देवाप्पा हा तर निसर्गातच विरून गेलेला व निसर्गाशिवाय त्याचे जगणेच असू शकत नाही. असे पात्र आहे त्याच्या स्वगतांमधून वेळोवेळी पर्यावरणविषयी प्राण्यांविषयी सदभाव दिसून येतो.

"आईला सगळं जीव सारखंच, बारकं, मोठं, सगळी सृष्टीच एकमेकांवर जगणार, जगवणार, कोण कोणाचा शिकारी, तर कोण कोणाचा भिकारी आणि कोण कोणाची तरी शिकार" (पृ १००)

"माणसाइतकी भूक जगात कुठल्या जीवाला असलं?" हा कटू व खरा प्रश्न देवाप्पा मांडतो.

देवाप्पा म्हणतो "बाकीची कसली बी वसप चाललं पर माणसाची वसप लय घाण" (पृ ४६) देवाप्पाच्या कुटुंबाला निसर्गाकडून गोष्टी ओरबाडून घ्यायला आवडत नाहीत. ते निसर्गाचा आदर करतात निसर्गातील जैविक-अजैविक गोष्टींचे मूल्य जाणतात. पर्यावरणातील अन्नसाखळीचा ते सन्मान करतात. येथे प्रत्येक प्राणी दुसऱ्या प्राण्यांवर अन्नासाठी अवलंबून आहे याची समज त्यांना आहे. त्यांना चुलीसाठी ओली लाकडे तोडलेली आवडत नाहीत. देवाप्पाला आणि त्याच्या कुटुंबीयांना झाडे खोडातून तोडलेली आवडत नाहीत. एकदा देवाप्पाच्या हातून व्यालेल्या सशीनीची शिकार होते तर

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, March 2026 Impact Factor: 8.2

तो तिची पिल्ली आणून स्वतःच्या मुलाप्रमाणे जपतो. तसेच पाणी पिण्यासाठी आलेल्या प्राण्यांची शिकार करायची नाही हा त्यांचा नियम आहे. निसर्ग आपल्याला इतके सगळे देत असतो त्याची परतफेड म्हणून आपण ही निसर्गाचे काहीतरी देणे लागतो असा भाव देवापाच्या मनी आहे.

कादंबरीतील मानव आणि निसर्गाच्या या तरल नात्याबद्दल विजय चोरमारे म्हणतात "मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंध विनाशाच्या कडेलोटावर उभे असताना लिहिली गेलेली ही संहिता आहे आधुनिकीकरणात अभिप्रेत असलेल्या विकासामुळे पर्यावरणाचे प्रश्न वैश्विक पातळीवर जटिल होत जाताना मानव आणि निसर्ग यांच्या संबंधांना स्पर्श करणारी ही संहिता आहे". यावरूनच हे दिसून येते की मानव आणि निसर्ग यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते दर्शवणारी रिंगाण कादंबरी आहे.

**समारोप**

माणूस हा किती मतलबी होत चालला आहे व प्रत्येक गोष्टीचा स्वतःच्या सोयीनुसार गरजेनुसार वापर करत चालला आहे. मग तो निसर्ग का असेना, निसर्गाला पशुपक्षांनासुद्धा माणूस आपल्या स्वार्थापूर्ते, फायद्यापूर्ते वापर करून घेत आहे. 'निसर्ग म्हणजे केवळ मानवाने उपभोग घ्यावयाची वस्तू आहे' असा जो मानवाचा 'समज' झाला आहे, तीच बाब 'रिंगाण' कादंबरी नेमकेपणाने अधोरेखित करते.

**निष्कर्ष**

या संशोधनातून आपल्याला खालील निष्कर्ष मिळतात.

- सध्याच्या युगात पर्यावरणविषयक जाणीवा लोकांच्या मनात निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. हे रिंगाण कादंबरीमुळे समजले.
- मानवाची प्रवृत्ती स्वकेंद्री झालेली आहे त्यामुळे पर्यावर्णाला हानी पोहचत आहे व ती हानी रोखणे आपली नैतिक जबाबदारी आहे हे कळले.
- मानवाचे आणि निसर्गाचे नाते बदलत चालले आहे. मानव आपल्या फायद्यासाठी निसर्गाचा उपयोग करून घेत आहे. व हे शाश्वत जीवनासाठी योग्य नाही म्हणून त्यावर उपाय योजना करणे गरजेचे आहे हे उमगले.

रिंगाण ही कादंबरी पर्यावरणाविषयक जाणीवा निर्माण करण्याची प्रेरणा वाचकांना देते.